म. ग्रं. मं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७०

# साहित्य संमेलन

## सातवें अधिवेशन.

अकोला ( वऱ्हाड ).

( ता. २९ माहे ऑक्टोबर १९१२. )

अध्यक्ष

रा. रा. हरि नारायण आपटे

यांचें

# भाषण.

REFBK-0000740

स. १९१२.

किंमत दोन आणे [redacted]

REFBK-0000740

# महाराष्ट्रीय साहित्य संमेलन.

वाग्वा ऋग्वेदं विज्ञापयति यजुर्वेदꣳ सामवेदमाथर्वणं चतुर्थमितिहासपुराणं पञ्चमं वेदानां वेदं पित्र्यꣳ राशिं दैवं निधिं वाकोवाक्यमेकायनं देवविद्यां ब्रह्मविद्यां भूतविद्यां क्षत्रविद्यां नक्षत्रविद्याꣳ सर्पदेवजनविद्यां दिवं च पृथिवीं च वायुं चाऽऽकाशं चापः तेजश्च देवाꣳश्च मनुष्याꣳश्च पशूꣳश्च वयाꣳसि च तृणवनस्पतीञ्श्वापदान्याकीटपतङ्गपिपीलिकं धर्मं चाधर्मं च सत्यं चानृतं च साधु चासाधु च हृदयज्ञं चाहृदयज्ञं च यद्वै वाङ्नाभविष्यन्न धर्मो नाधर्मो व्यज्ञापयिष्यन्न सत्यं नानृतं न साधु नासाधु न हृदयज्ञो नाहृदयज्ञो वा वैतत्सर्वं विज्ञापयति वाचमुपास्स्वेति।

छान्दोग्योपनिषत्, अ०

वाणी हीच ऋग्वेदाचा अर्थ समजाविते. यजुर्वेदाचा, सामवेदाचा, आथर्वण जो चवथा वेद व इतिहासपुराणसमुच्चय जो पांचवा वेद, त्यांचें ज्ञान तीच करून देते. वेदव्याकरणादि विषय, पितृसंबंधीं क्रियाकर्मादि, गणितविद्या, उत्पातादिकांचें ज्ञान, निधिविद्या, तर्कविद्या, नीतिविद्या, देवविद्या, ब्रह्मविद्या, भूतविद्या, क्षत्रियविद्या, नक्षत्रविद्या (ज्योतिष), सर्पविद्या, गंधर्वविद्या, आयुर्वेद, यांचें ज्ञान वाणीच्याच योगें होतें; स्वर्ग, पृथ्वी, वायु, आकाश, आप, तेज, देव, मनुष्य, पशु, पक्षी, तृण, वनस्पती, श्वापदें, कीटक, पतंग, मुंगी यांच्यासंबंधाचें ज्ञान, धर्म आणि अधर्म, सत्य आणि मिथ्या, चांगलें आणि वाईट, आनंदकर आणि दुःखकर यांचें ज्ञान, हीं वाणीच्याच द्वारें लाभतात. वाणी जर नसती तर धर्म कोणता, अधर्म कोणता ? हें समजलें नसतें. सत्य कोणतें, मिथ्या कोणतें ? चांगलें कोणतें, वाईट कोणतें ? आनंदकर कोणतें, दुःखकर कोणतें ? हें कांहींच समजलें नसतें. ह्या सर्वांचें ज्ञान वाणीच करून देते; तेव्हां वाणीची उपासना कर.

वाङ्मयाचें अत्यंत उत्कृष्ट असें एखादें स्तोत्र तयार करून या अशी जर कोणीं एखाद्या कवीला आज विनंति केली किंवा एखाद्या तर्क-शास्त्रज्ञाला वाङ्मयाची व्याख्या बनविण्यास सांगितलें, तर आतां मीं आपणास वाचून दाखविलेल्या स्तोत्रांतल्यापेक्षां अधिक स्तुति किंवा त्या-पेक्षां अधिक व्यापक व्याख्या त्यांच्या हातून निर्माण होतील असें मला वाटत नाहीं. प्राचीन काळचे ऋषि वाणीला ब्रह्मच समजत, आणि ते वाणीला इतकें महत्व देत कीं त्यापेक्षां एका ब्रह्माखेरीज कशालाच त्यांनीं तितकें महत्व दिलेलें नाहीं. ज्या छान्दोग्यांतून मीं वरील उतारा वाचला त्या उताऱ्याच्या अगदीं पुढेंच नारदानें सनत्कुमारास असें विचा-रलें आहे कीं " भगवन्, वाणीपेक्षांही श्रेष्ठ असें कांहीं आहे काय ? " आणि सनत्कुमारांनीं "होय, आहे. वाणीपेक्षां मन हें श्रेष्ठ आहे, मनाहूनही संकल्प श्रेष्ठ आहे; " अशी उत्तरोत्तर श्रेष्ठतायुक्त वस्तुपरंपरा सांगि-तली आहे. तरी मी प्राचीन काळचे ऋषि वाणीला ब्रह्माच्या खालोखाल श्रेष्ठ मानीत असें स्पष्ट म्हणतों आहें, यामुळें माझ्या श्रोत्यांपैकीं कित्येक आश्चर्य पावतील, परंतु त्यांनीं एवढें ध्यानांत ठेवावें कीं " नादब्रह्म, " " शब्दब्रह्म, " "वाग्ब्रह्म," असे शब्द जसे उपनिषदादि ग्रंथांतून वारंवार सांपडतात, तसे " मनोब्रह्म, " " संकल्पब्रह्म, " असे कोठेंही आढळत नाहींत. कारण "ब्रह्मानें" आपण प्रकट व्हावें म्हणून आपल्या "मनांत" कितीही "संकल्प" केला, तरी तो " शब्दानें " " Logos " रूपानें व्यक्त व स्फुट होईपर्यंत कोणासही समजणें शक्य नव्हतें. तो ' प्रणवा 'च्या रूपानें बाहेर पडेपर्यंत—त्याचा वाणीच्या द्वारें उच्चार होईपर्यंत—त्या वाणीनें ' अक्षर ' रूप घेईपर्यंत त्याचें ज्ञान कोणासही झालें नव्हतें. तें ज्ञान जगांत आलें, तें प्रणवाच्या—अक्षराच्या— द्वारेंच आलें. या दृष्टीनें पहातां वाणीच्या सामर्थ्याचें—वाङ्मयाच्या प्रभावाचें—मोठें स्तोत्र गाण्याची आवश्यकता नाहीं.

आणि दुसऱ्याही एका दृष्टीनें पहातां तसें स्तोत्र गाण्याची आज आपणास आवश्यकता नाहीं. कांकीं, आम्ही सर्वच आजकाल वाङ्मया-चे कट्टे उपासक बनत चाललों आहों. पुस्तकें हीं आमचे जिवलग स्नेही बनले आहेत. ज्याला कोणाला अक्षरओळख झाली आहे तो कांहींना

कांहीं तरी वाचीत असतों; पुस्तकेंच पुष्कळांस गुरुस्थानीं आहेत. पुस्तकांपासून आम्ही शिक्षण मिळवितों, पुस्तकांवरूनच दुसऱ्यांस शिक्षण देतों, पुस्तकांपासूनच विचारांचा उद्भव होतो, विकारांची जागृति होते, मनाचें मनोरंजन होतें. ज्यांस वाचतां येत नाहीं, त्यांस जग शून्यवत् झालें आहे अशी आमच्या मनाची पक्की श्रद्धा बनली आहे. त्यांची स्थिति सुधारण्यासाठीं आम्हीं प्रयत्न करूं लागलों आहों. जपानच्या माजी राजानें जसा आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभींच फर्मन काढून द्वाही फिरविली कीं "आजपासून माझ्या राज्यांत निरक्षरता म्हणून राहतां कामा नये," तसा फर्मन आपल्या बादशाहांनींही काढून निरक्षरतेला हिंदुस्थानांतून हद्दपार करावें असें आपणा सर्वांचें हरदम हरघटकेला त्यांचे जवळ मागणें आहे. साक्षरतेची अवश्यकता आपणास इतकी वाटूं लागली आहे. आज आपण येथें जमलों आहों, बंगाली, हिंदी व ऊर्दू वगैरे भाषा बोलणारे लोक आपआपल्या प्रांतांतून असेच दरसाल जमत असतात, हें सर्व या वाङ्मय-प्रेमाचेंच लक्षण होय. आपआपल्या बांधवांची निरक्षरता जावी आणि आपल्या भाषेच्या द्वारें वाङ्मयाची अभिवृद्धि व्हावी. या एका हेतूनें आपणा सर्वांचे प्रयत्न चालले आहेत, हे प्रयत्न चालले आहेत तेही वाणीच्या-वाङ्मयाच्या-साहाय्यानें चालले आहेत हें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

वाङ्मय हें राष्ट्राच्या उन्नतीचें कारणही आहे, आणि कार्यही आहे. राष्ट्राचा जसजसा उत्कर्ष होतो, तसतसा वाङ्मयाचा उत्कर्ष होतो, आणि वाङ्मयाला जितकें जितकें उज्ज्वल व उन्नत स्वरूप येत जाईल, तितकें तितकें राष्ट्राच्या उन्नतीला व उज्ज्वलतेला तें कारण होतें. वाङ्मयाच्या योगानें आमची विचारशक्ति उद्दीप्त होते, आमचे मनोविकार जागृत होतात, आमचें अंतःकरण उल्हसित होतें. आमच्या पूर्वजांनीं संगृहीत केलेल्या ज्ञानाच्या, त्याचप्रमाणें ज्यांच्या ज्याच्याशीं आमचा संबंध येतो, त्यांनीं त्यांनीं संगृहीत केलेल्या ज्ञानाचा उपयोग करून आह्मांस आपल्या ज्ञानांत व भावि पिढ्यांच्या ज्ञानांत भर घालितां येते. ही भर घालण्याची अवश्यकता जों जों अधिक अधिक स्पष्टपणें आपल्या नजरेस येत चालली आहे, तों तों वाङ्मयाच्या उत्कर्षासाठीं झटणारे

सेवकही तयार होऊं लागले आहेत. आज आमच्यांत जी काय सार्व-विषयक जागृति दिसूं लागली आहे, ती वर्तमानपत्रें, मासिकें, त्रैमासिकें व स्वतंत्र पुस्तकें इत्यादि रूपानें होणाऱ्या आमच्या वाङ्मयसेवेचेंच फल होय असें स्पष्टपणें विधान करण्यास मला अणुमात्र संकोच वाटत नाहीं. इतर भाषांतील ( हिंदुस्थानांतल्या ज्या चार दोन भाषांची मला माहिती आहे त्या भाषांच्यासंबंधानें मी हें बोलत आहें ) वाङ्मयाचा जसा उत्कर्ष होत आहे, तसाच किंबहुना कांकणभर जास्तच आमच्या मराठी भाषेंतील वाङ्मयाचाही उत्कर्ष होत आहे असें माझ्या मनास पूर्णपणें वाटत आहे. या माझ्या विधानानें, यंदांच्या या आपल्या वाग्यज्ञाच्या तीन दिवसांच्या सत्रांत विवेचनाकरितां नेमलेल्या विषयांपैकीं एका महत्वाच्या विषयाचा मी पूर्वपक्षच करीत आहें हें मी जाणून आहें. ज्या स्थानावर आपण मला बसविलें आहे त्या स्थानावरून पूर्वोत्तर पक्ष करीत बसूं नये हेंही माझ्या लक्षांत आहे, परंतु जिना चढत असणाऱ्या माणसाला आपण वर चाललों आहों कीं खालीं उतरतों आहों, याचीच भ्रांति झाली, तर ती भ्रांति दूर करणें हें पहिलें काम होय, हें कोणीही कबूल करील; मराठी साहित्यसेवकांनीं आजपर्यंत वाग्यज्ञाचीं सहा सत्रें केलीं, आजचें हें सातवें सत्र होय. कित्येक आक्षेपक असें ह्मणतात कीं या "सहा सत्रांत झालेल्या ऊहापोहांचा उपयोग कांहीं झाला नाहीं, इतकेंच नव्हे, तर आमच्या वाङ्मयाचा—आमच्या भाषेचा—आधींच ऱ्हास होत चालला आहे, त्या ऱ्हासाला या सत्रांतील ऊहापोहांनीं अधिक वेग दिला गेला." असें जर खरोखर कोणास वाटूं लागलें असेल, तर तो त्याचा भ्रम दूर करावा किंवा आपली समजूत भ्रमाची आहे ही खात्री करून घेऊन आपला भ्रम तरी दूर करून घ्यावा हें अशा प्रसंगीं अत्यंत युक्त होय. हा सर्व विचार करून मी आपल्या या भाषणांत याच विषयाचा यथामति विचार करणार आहें. याबद्दल आपण सर्वांनीं क्षमा करावी अशी माझी विनंति आहे.

"एकंदरींत वाङ्मयाचा ऱ्हास होत चालला आहे, चांगलीं पुस्तकें निघत नाहींत, गचाळ पुस्तकें भाराभर निघालीं म्हणून काय झालें ? त्यानें कांहीं वाङ्मयाचा उत्कर्ष होतो आहे असें म्हणतां येणार

नाहीं, उत्कर्ष होतो आहे असें म्हणणारे भ्रांतींत गटंगळ्या खात आहेत," वगैरे विधानें आजच आणि आमच्याच भाषेंतील वाङ्मयासंबंधानें केलीं जात आहेत असें नाहीं. वाङ्मयाच्या उत्पत्तीपासून प्रत्येक भाषेंतील वाङ्मयासंबंधानें त्या त्या कालीं कांहीं असंतोषी विवेचक निघतातच. "मागल्या काळीं जसें वाङ्मय झालें तसें आज उत्पन्न होत नाहीं," असें विधान करून ते समकालीन लोकांस न जाणतां उत्तेजन देत असतात असें मी समजतों. "गेला तो काळ अति उत्तम, सध्यांचा वाईट, आणि पुढें येणारा तर किती भयंकर होणार आहे याचा नेमच नाहीं," हा कित्येक गृहस्थांचा नेहमींचाच जप. गतकाळच्या समाजाची, महर्षींची, साधु पुरुषांची, कर्तृत्ववान् पुरुषांची, ग्रंथकारांची, कारागिरांची वगैरे स्तुति करूनच हे राहत नाहींत; तर त्यांना सद्यःकालीन समाजाची व त्या समाजाच्या हितासाठीं व उन्नतीसाठीं आपआपल्या परीनें मनःपूर्वक झटणाऱ्या पुरुषांची निंदा करून आपला समाज अधोगतीस चालला आहे असें अट्टाहासानें सांगत बसल्याखेरीज संतोषच होत नाहीं. सद्यः-कालीन कर्तृत्ववान् पुरुषांच्या मनांत पूर्वकालीन पुरुषांबद्दल अभिमान नसतो असें या लोकांस वाटत असतें. आपल्या पूर्वजांबद्दलचा अभिमान खऱ्या दृष्टीनें पहातां सद्यःकालीन कार्यकर्त्यांना कांहीं कमी असतो असें नाहीं, किंबहुना त्या अभिमानाच्या सामर्थ्यानेंच त्यांचे प्रयत्न चाललेले असतात. परंतु त्यांना आपल्या परिस्थितीप्रमाणें कार्य करावयाचें असल्यामुळें अर्थातच नवीन नवीन उपाय योजावे लागतात. या नवीन उपायांचा नवीनपणा हाच कित्येकांस आपल्या ऱ्हासास कारण होईल असें वाटूं लागतें, आणि ते "ऱ्हास! ऱ्हास!" "अवनति!" "अवनति!" अशी ओरड करूं लागतात.

परंतु या सामान्य ऱ्हासासंबंधीं ओरडीशीं आपल्याला कांहीं करावयाचें नाहीं, वाङ्मयापुरतेंच—मराठी वाङ्मयापुरतेंच—आपणास पहावयाचें आहे. मराठी भाषेचा उत्कर्ष होत आहे कीं अपकर्ष होत आहे? तिची उन्नति होत आहे कीं अवनति चालली आहे? हें आपणास विवेचावयाचें आहे.

परंतु कोणतेंही विवेचन करून कांहीं सिद्धांत ठरवावयाचा अशी उमेद धरण्यापूर्वी मुख्य शब्दांच्या व्याख्या ठरविणें हें अत्यंत आवश्यक

आहे. ' उन्नति, ' ' उत्कर्ष, ' या शब्दांचे अर्थ आपण समजतों तरी काय ? हें ठाम ठरलें पाहिजे. त्याखेरीज सिद्धांत तरी काय ठरविणार तेव्हां उन्नति म्हणजे काय हें आधीं आपण थोडक्यांत पाहूं.

उन्नति progress म्हणावयाचें कोणत्या स्थितीला ? आणि ती होते तरी कशी ? यासंबंधानें जेम्स मार्टिनो यांचा एक सुंदर उतारा मी आपणापुढें ठेवतों.

The first party of painted savages who raised a few huts upon the Thames did not dream of the London they were creating, or know that in lighting the fire on the hearth they were kindling one of the great foci of Time. All the grand agencies which the progress of mankind evolves are formed in the same unconscious way. They are the aggregate result of countless single wills, each of which, thinking of its own end, and, perhaps fully gaining it, is at the same time enlisted by Providence in the secret service of the world.

—*James Martineau*.

उन्नतीचें खरें स्वरूप, उन्नतीचा खरा वेग, उन्नतीचीं खरीं द्वारें हीं अशीं आहेत. परंतु हें उन्नतीचें स्थूल स्वरूप झालें. सर्व विश्व उन्नत होत चाललें आहे कीं अवनत होत चाललें आहे, याच्या विचारास लागलेल्या माणसानें जें उन्नतीचें स्वरूप ध्यानांत घ्यावें तें हें स्वरूप झालें. आपल्याला आपल्यापुरतें पहावयाचें आहे—आपल्यापुरतेंही नाहीं—आपल्या वाङ्मयापुरतेंच पहावयाचेंच आहे. वर सांगितलेलें उन्नतीचें स्वरूप आपल्या वाङ्मयाच्या उन्नतीस येत चाललें आहे काय ? या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें ह्मणजे आणखी एक प्रश्न विचारावयाचा तो हा. " आपल्या वाङ्मयाची उन्नति व्हावी म्हणून आज अनेक व्यक्ति .आपापल्या परीनें—आपल्या परिस्थितीच्या मानानें - प्रयत्न करीत आहेत कीं नाहींत ? आज आपण जमलों आहोंत हे आणि जे येथें आज येऊं शकले नाहींत असे शंभर-

पट दुसरे या प्रश्नाचें उत्तर देतील, मीच द्यावयास नको. आज त्यांच्या समुदायास " असंख्य " " Countless " असें म्हणतां येत नाहीं हें कोणीही कबूल करील. परंतु आमच्या परिस्थितीच्या मानानें महाराष्ट्रवाङ्मयक्षेत्रांत कायावाचामनानें झटून काम करणारे कृषीवल दिवसानुदिवस संख्येनें एकसारखे वाढतच आहेत असें म्हणण्यास अणुमात्र प्रत्यवाय नाहीं. उन्नतीला मुख्य कारण जो " संकल्प " will—जो उपनिषद्द्रष्टया ऋर्षीनीं वाणीपेक्षां व मनापेक्षांही श्रेष्ठ असें सांगितलें आहे-तो संकल्प आमच्यामध्यें जागृत होऊन कांहीं करूं लागला आहे कीं नाहीं ? याचें उत्तर ' होय ' या व्यक्षरी शब्दाखेरीज दुसरें नाहींच. हा संकल्प उदित झाला आहे, आणि त्याचीं फलेंही दृश्य होत चाललीं आहेत. आपल्या वाङ्मयक्षेत्राची सुधारणा करून त्याची चांगली मशागत करून त्यांत उत्तम बीं पेरलें पाहिजे, त्या बीजाला जलसेक करून त्याचे वृक्ष बनविले पाहिजेत व त्यांचीं फळें आपल्या बांधवांना दिलीं पाहिजेत, असा निर्धाराचा संकल्प अनेक सुशिक्षितांच्या मनांत प्रबुद्ध झाला आहे हें आमच्या वाङ्मयाच्या उन्नतीचें पहिलें लक्षण. आपलें हें वाग्यज्ञाचें आजचें सत्र आणि मागलीं सहा सत्रें त्या संकल्पाच्या दृश्य फलांपैकींच फार महत्वाचें फल होय.

परंतु या एका लक्षणावरूनच उन्नति होत चालली आहे असें म्हणतां येणार नाहीं. उन्नति होण्याचें एक लक्षण दिसलें म्हणून काय झालें ? असा प्रश्न कित्येकांकडून येणारच. तेव्हां याच्याही पुढें उन्नतीचीं दुसरीं कांहीं लक्षणें दिसताहेत काय हें पाहूं.

सामान्य ' उन्नतीचे ' जे नियम तेच वाङ्मयाच्याही उन्नतीला लागू असणारच; तेव्हां सामान्य उन्नतीचे मुख्य नियम आधीं थोडक्यांत सांगून ते आपल्या वाङ्मयाच्या सद्यःस्थितीला लावून पाहूं.

उन्नतीच्या अनेक प्रकारांत मुख्य दोन प्रकार आहेत. एक बाह्योन्नति व दुसरी अंतरुन्नति. बाह्योन्नति म्हणजे डोंगरासारखी आणि अंतरुन्नति

म्हणजे झाडांच्यासारखी उन्नति. डोंगर हळूहळू उन्नत होत असतात. "डोंगर वनणें" असें आपण म्हणतों. याचा अर्थ दिवसानुदिवस त्यावर बाहेरील मृत्तिकादिक येऊन सांचत सांचत तो उंच होतो. परंतु झाडें त्यांच्यावर बाहेरल्या कांहीं द्रव्यांचीं पुटें बसून वाढत नाहींत. डोंगर वाढण्यास–उन्नत होण्यास–काय किंवा वृक्षादिक वाढण्यास काय, बाहेरील द्रव्यांची अपेक्षा असतेच. परंतु एकावर बाह्यद्रव्यांचीं पुटेंचीं पुटें चढत जाऊन तो वाढत जातो आणि दुसरा म्हणजे वृक्ष अवश्य त्या द्रव्यांतून स्वपोषणासाठीं लागणाऱ्या रसांचें अंतर्ग्रहण करून आंतून वाढत जातो. वृक्ष किंवा इतर सेंद्रिय प्राणी आंतून कांहीं एका सामर्थ्यानें वाढत जातात. विश्वाच्या व्यवस्थेंत या दोनही प्रकारच्या उन्नति त्या त्या दृष्टीनें इष्टच आहेत. मोठमोठाले डोंगर पृथ्वीवर उत्पन्न झाले ते एक प्रकारच्या उन्नतिनियमांनीं, व सेंद्रिय व सजीव पदार्थांची उन्नति झाली-व होते आहे-ती दुसऱ्या प्रकारच्या नियमांनीं. सेंद्रियांस लागू असणारेच नियम समाजाच्या व संस्थांच्या उन्नतीला लागू आहेत, आणि समाजाच्या अंतर्भूत भाषा, वाङ्मय, शास्त्रज्ञान वगैरेंची उन्नति अर्थातच त्याच नियमानुसार होत असते. राशीभवन accumulation हा एक उन्नतिमार्ग, व विकसन development हा दुसरा मार्ग. राशीभवनांत थरावर थर मात्र बसतात, पण मूळचे थर नाहींसे होत नाहींत; ते खालीं तसेच कायम असतात. विकसनांत क्षणोक्षणीं नवीनता येते, पूर्वीचें जुनें असें कांहीं रहात नाहीं; याचें उत्कृष्ट उदाहरण उत्तररामचरितांत श्रीरामचंद्रांच्या एका उद्गारांत फार उत्तमपणें आलें आहे. श्रीरामचंद्र आपल्या पत्नीसह वनवास भोगीत असतां ज्या वनप्रदेशांत राहिले होते, त्याच वनप्रदेशांत पुढें राज्य प्राप्त झाल्यानंतर एकदां आले, तों त्यांस आपण आतां संचार करीत असलेलें वन पूर्वींचेंच होय अशी मनाची खात्री पटण्याला एक पर्वत मात्र कारण झाला. बाकी सर्व बदलून गेलें होतें.

**पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरितां**
**विपर्यासं यातो घनविरलभावः क्षितिरुहां ।**

बहोर्दृष्टं कालादपरमिव मन्ये वनमिदं
निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिं द्रढयति ॥

विकसन होत असतें तें अंतरंगीं होणाऱ्या क्रियांचें फल होय. बाह्य द्रव्यांचें शोषण करून घेऊन त्यांतील पोषणोपयोगी रस उपयोगांत आणावयाचा व निरुपयोगी द्रव्यें फेंकून द्यावयाची ही क्रिया प्रत्येक सेंद्रिय व सजीव पदार्थांत चाललेली असते. या पोषणोपयोगी क्रिया ज्यांच्याकडून अगदीं उत्तम प्रकारें होतात, त्यांचें पोषण फार उत्कृष्ट होऊन त्यांना पुष्टि येते. ज्यांच्याकडून या क्रिया बरोबर होत नाहींत त्यांना पुष्टि येणें शक्यच नाहीं. कित्येक उपासमारीनें मरतात, तर कित्येक अजीर्णाच्या रोगानें मरतात. परंतु नवीन द्रव्यांच्या शोषणावांचून व त्या शोषणानें आंत घेतलेल्या रसाच्या पचनावांचून अंगीं पुष्टि येणें शक्यच नाहीं. जें केवळ जुनेंपुराणें आहे, तेवढेंच द्रव्य घेऊन त्याच्यावर निर्वाह करूं म्हणून चालत नाहीं. सांचवणीच्या पाण्यानें कधीं निभत नाहीं. त्या पाण्याच्या संचयांत नवीन झरे आणून सोडले पाहिजेत, नवीन ओढे आणून त्यास मिळविले पाहिजेत. जुनें पाणी थोडेंबहुत तरी वाहून जाऊं दिलें पाहिजे. जुन्यांत कांहीं तरी खळबळ केल्याखेरीज कधीं चालावयाचें नाहीं. पाये जुने, गांवठाणें जुनीं, असलीं तरी हरकत नाहीं; किंबहुना जुनीं असलीं तर चांगलीं. पण इमारती नव्या पाहिजेत. शहरें नवीं वसलीं पाहिजेत. नव्या परिस्थितीला आवश्यक अशा सोयी पाहिजेत. तीच स्थिति वाङ्मयाचीही आहे. पुराणप्रियताही आमच्या हाडींमासीं आज पिढ्यानूपिढ्या खिळलेली आहे. ती कधींही जावयाची नाहीं. जुन्याविषयीं राहावयाचा तितका अभिमान अवश्य राहील. परंतु परिस्थितीला आवश्यक तितका बदल आमच्या सामाजिक, सांसारिक स्थितींत तसाच वाङ्मयांतही झालाच पाहिजे, आणि तसाच तो होतही आहे. किंबहुना प्रारंभींच सांगितल्याप्रमाणें आमच्या सध्यांच्या सामाजिक स्थितींत आवश्यक व्हावयास पाहिजे असा बदल, आमच्या वाङ्मयाच्या द्वारेंच होत आहे व त्या होणाऱ्या बदलाचा परिणाम पण वाङ्मयावरही होत आहे. हा अन्योन्याश्रय अन्योन्यांच्या उन्नतीस कारण होत आहे.

राशीभर्वन आणि विकसन हे जे दोन उन्नतीचे मार्ग सांगितले त्या दोन मार्गांपैकीं विकसनाचा मार्ग अत्यंत श्रेयस्कर हें तर उघडच आहे. मुलगा कपड्यांनीं लठ्ठ करून दाखवून कधींही चालावयाचें नाहीं. त्याला आंतूनच बाळसें येत गेलें पाहिजे. परंतु त्याला बाळसें येण्याला आरोग्य पाहिजे. आणि आरोग्य राखण्याला कपड्यालत्त्यांचीही आवश्यकता असते, निदान या सध्यांच्या काळांत सध्यांच्या समाजस्थितींत तरी खास असते. तेव्हां कपड्यालत्त्यांनीं दिसणारें बाळसेंही अगदीं निंद्य व त्याज्य असें नाहीं, त्याचाही उपयोग आहेच, खरें बाळसें चिरस्थायी होण्याला त्याचीही अवश्यकता असते.

आमच्या वाङ्मयाची उन्नति कोणत्या प्रकारानें होत आहे ? ती डोंगरासारखी होत आहे कीं झाडासारखी होत आहे ? माझ्या मतें झाडासारखी होत आहे. लेखकांच्या मनांत ज्ञानप्रसाराची इच्छा उद्दीप्त होऊन ग्रंथ निर्माण होत आहेत. त्यांच्यापैकीं कांहींचे प्रयत्न निरपेक्ष बुद्धीनें चालले आहेत. त्यांना बाह्य साहाय्य जवळ जवळ नाहींच; सरकारचा आश्रय नाहीं, युनिव्हर्सिटीचें पाठबळ किंवा उत्तेजन नाहीं, असें असतां ग्रंथ निर्माण होणें म्हणजे सामान्य गोष्ट नव्हे. बंगाली वाङ्मयाची वाढ त्यांच्यांतील धनिकांच्या साहाय्यानें झाली व लोकसंख्या सात कोटि असल्यामुळें लोकाश्रयही बराच लाभला, परंतु आह्मांस तसल्या साहाय्यांचाही लाभ बेताचाच.

आतां या सर्व विवेचनाचा प्रस्तुताशीं काय संबंध आहे हें पाहूं. आमचें सध्यां बाळसेंदार म्हणून नांवाजलेलें वाङ्मय हें खरोखर बाळसेंदार नव्हे. ही त्याच्या अंगाला सूज आली आहे असें कित्येकांचें ह्मणणें आहे. ते म्हणतातः—" दरसाल प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची संख्या वाढत चालली आहे यावर जाऊं नका. त्यांतली बहुतेक गचाळ व हानिकारक असतात, तेव्हां तीं न झालेलीं बरीं. रक्तदोषापासून गालांवर दिसणारी लाली आरोग्याची गुलाबी छटा असें समजूं नका. पंडुरोगानें आलेला पांढरेपणा हा गोरेपणा, किंवा कामिणीनें आलेला पिंवळेपणा ही निंबकांति, असा भ्रम धरून बसूं नका." असें अट्टाहासानें आपणास आज कित्येक हितैषी बजावीत आहेत. परंतु

इतकें वजाविण्याची अवश्यकता उत्पन्न होण्याइतकी भ्रांति कोणास झाली आहे असें मला वाटत नाहीं. आह्मी बाल्यावस्थेंत असून थोरांशीं कुस्ती करण्याच्या बढाया मारूं लागलों आहों असें मुळींच नाहीं. आमचें ह्मणणें एवढेंच कीं, आह्मी आमच्या परिस्थितीच्या मानानें जितकें व जसें वाढणें शक्य व इष्ट तितके व तसें वाढत आहोंत. आमची वाढ खुंटली नाहीं, आह्मी खुरटत नाही, आमचें पाऊल मागें नाहीं, आमचें पाऊल चुकल्या मार्गावर पडलेलें नाहीं. आमच्या परिस्थितीच्या, आमच्या साधनांच्या, वगैरे मानानें आह्मी योग्य मार्गानें व योग्य वेगानें पुढें चाललों आहों. आमच्या वाङ्मयसाम्राज्याचा विस्तार आह्मी दिवसानुदिवस वाढवीत चाललों आहों. जे जे प्रांत विस्तीर्ण व सुंदर करण्याची आवश्यकता दिसून येते ते ते प्रांत वाढवून सुंदर बनविण्यासाठीं आमचे प्रयत्न सुरू आहेत. याचें प्रत्यंतर पहाण्यास लांव जावयास नको.

वाङ्मयाचे मुख्य हेतु सध्यांच्या आपल्या वाङ्मयाच्या द्वारें आपल्या परिस्थितीला योग्य तसे सिद्ध होतात कीं नाहीं पहा. वाङ्मयाचे हेतु किंवा त्याचीं तत्वें तीनः १ शिक्षण देणें, २ मनोविकार किंवा विचार जागृत करणें, आणि ३ मनोरंजन करणें. या तीनही हेतूंच्या सफलतेसाठीं पुस्तकें निर्माण होताहेत कीं नाहींत ? रावसाहेब गणेश जनार्दन आगाशे यांनीं गतवर्षी बडोदें येथें भरलेल्या संमेलनाच्या वेळीं महाराष्ट्रवाङ्मयाची वाढ दाखविण्यासाठीं एक निबंध लिहून पाठविला. या निबंधांत त्यांनीं १९०८ सालापर्यंत निरनिराळ्या विषयांत पुस्तकसंख्या कसकशी वाढत गेली आहे हें दाखविलें आहे. मी त्यांतील आंकडे घेऊन आपणांस कंटाळा आणीत नाहीं. परंतु येथें एवढेंच म्हणतों कीं, वर सांगितलेल्या तीनही प्रकारच्या वाङ्मयांत सद्यःस्थितीला शक्य तितकी भर पडत चालली आहे असें तो निबंध वाचला म्हणजे सहज समजेल. अमुक एका विषयासंबंधानें ग्रंथसंख्या अमुक व्हायला पाहिजे असें नक्की प्रमाण थोडेंच आहे. लोकांची वाचनाची अभिरुचि जसजशी वाढत जाते, तसतशी ग्रंथसमृद्धि होते. ज्या ग्रंथास मागणीच नाहीं– किंवा असली तरी इतकी तुटपुंजी आहे कीं, सामान्य जनांना असले

ग्रंथ निर्माण करणें व प्रसिद्ध करणें शक्य नाहीं—ते ग्रंथ एकंदर वाङ्मय-दृष्ट्या जरी अवश्य असले, तरी ते निर्माण होण्यास श्रीमंत लोकांचेंच साहाय्य पाहिजे, त्याखेरीज बुडीत खर्च सोसून कोणी ते निर्माण करणें शक्य नाहीं. ज्याप्रमाणें व्यापार-व्यवहारांत, त्याचप्रमाणें या वाङ्मयाचे बाबतींतही अर्थशास्त्राची मागणी व पुरवठा याबद्दलचा नियम लागू पडतो. आज आमच्या वाङ्मयांत नौकाशास्त्रावर ग्रंथ नाहीं, ही वाङ्मयाच्या महत्वाच्या दृष्टीने मोठी उणीव आहे. परंतु ही उणीव भरून निघणें—आणि ती केवळ ग्राहकांच्या साहाय्यावर भरून निघणें—केवळ अशक्यच आहे. एक तर लिहिणारास साधनांची व स्वानुभवाची प्रतिकूलता; आणि दुसरें एखाद्यास अनुकूलता प्राप्त झाली, व त्यानें सर्व साधनें मिळवून ग्रंथ लिहिला तरी त्याचा उपयोग काय होणार? त्याला तो आंतबट्ट्याचाच व्यापार होणार. राजाश्रयावांचून किंवा धनिकाश्रयावांचून असा ग्रंथ छापून प्रसिद्ध होणें जवळजवळ दुरापास्तच होय. परंतु असाही ग्रंथ एका गृहस्थानें लिहून छापवून तयार केला आहे हें केवढें आश्चर्य ! शिक्षणप्रसाराची इच्छा हेंच या ग्रंथाच्या जन्मास कारण नव्हे काय ? विशिष्ट धंद्यासंबंधाच्या बहुतेक पुस्तकांची हीच स्थिति होय. परंतु असे उपयुक्त ग्रंथ थोडे निघतात म्हणून आमच्या वाङ्मयाची वृद्धि होत नाहीं, त्यांत कांहीं तात्पर्य नाहीं, असें म्हणणें रास्त होणार नाहीं. लोकांस वाचनाची अभिरुचि लागली आहे. आपला पोटाचा धंदा करून उरलेल्या वेळांत ज्ञान संपादन करावयाचें तें मुख्यतः मनुष्य धर्मसंबंधीं ग्रंथ वाचून मिळवितो, तसेंच इतिहाससंबंधीं अगर चरित्रसंबंधीं ग्रंथ वाचून मिळवितो व कंटाळल्यास मनोरंजक ग्रंथ वाचून आपली करमणूक करून घेतो. यामुळें अर्थातच तसल्याप्रकारचे ग्रंथ इतर ग्रंथांच्या संख्येपेक्षां अधिक निर्माण होतात. एकंदर ग्रंथसंख्येच्या निदान एकतृतीयांश मनोरंजक ग्रंथ असतात हें आमच्याच वाङ्मयाचें " दुर्दैव " आहे असें नाहीं. जगांतील कोणच्याही देशांत हाच प्रकार दिसून यावयाचा. कोणत्याही सार्वजनिक पुस्तकालयाची नोंदणीबुकें पहा, त्यांत मनोरंजक पुस्तकें जितकीं वाचलीं जातात, त्यांच्या तिसरा हिस्साही इतर

पुस्तकें वाचलीं जात नाहींत असेंच आढळेल. यांत नवल कसलें? मनुष्य उत्सवप्रिय असतो, तसाच मनोरंजनप्रिय असतो. दिवसभर श्रम करून किंवा आपला व्यवसाय करून रिकामा वेळ आनंदांत घालवावयाचीं जीं साधनें असतात त्यांत वाचन—मनोरंजक पुस्त॰ कांचें वाचन—हें एक साधन पुष्कळांच्या उपयोगी पडतें. तेव्हां इ० स० १८८४ सालापासून १९०८ सालापर्यंतच्या पावशतकांत झालेल्या ३४१६ पुस्तकांत नुसतीं काव्यें, नाटकें व कादंबऱ्या या तीन सदरांखालील पुस्तकें जर १२०० भरलीं तर त्यांत नवल नाहीं. इतर पुस्तकांपैकीं शालोपयोगी पुस्तकें वजा केलीं असतां बाकीचीं केवळ विविध विषयांचें ज्ञान आपल्या देशांत प्रसृत व्हावें या हेतूनेंच तयार झालीं असलीं पाहिजेत, हें अगदीं उघड आहे. मागणीकरितां म्हणूनच केवळ तीं अस्तित्वांत आलीं असें म्हणतां येत नाहीं. इतर पुस्तकांशीं तुलना करतां तादृश अशा पुस्तकांस मागणी नसावयाचीच. तरी पण लोकांत अशा विषयांची जिज्ञासा वाढत चालली आहे ही एक गोष्ट लक्ष्यांत घेण्याजोगी आहे. महाराष्ट्रवाङ्मयांत विशेषतः धर्मविषयक ग्रंथांची भर हल्लीं किती वेगानें पडत आहे हें पाहिलें म्हणजे तद्विषयक जिज्ञासा फारच वाढत चालली आहे असें दिसून येतें. भगवद्गीतेचीं भाषांतरें कितीतरी झालीं आहेत. उपनिषदांचीं भाषांतरें होत आहेत, वेदांचीं भाषांतरें निघूं लागलीं आहेत, शिवाय वेदांतसंबंधीं पुस्तकें किती तरी निघत आहेत, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ यांच्या पुस्तकांचीं भाषांतरें होत आहेत. नाहीं नाहीं ह्मणतां मराठ्यांच्या इतिहासाची सामग्री किती तरी प्रसिद्ध होऊं लागली आहे. शिवाय शास्त्रीय विषयावरही एखादा दुसरा ग्रंथ तयार होऊन बाहेर पडतच असतो. असले ग्रंथ शाळांतून चालत नाहींत, आणि त्याला गिऱ्हाईकही बेताचेंच; परंतु ग्रंथ बाहेर पडतांस हें एक खरोखर सुचिन्ह आहे. ग्रंथकाराची ज्ञानप्रसाराविषयींची उत्सुकताच त्या ग्रंथाच्या जन्मास कारण होय. युनिव्हर्सिटींतून शिक्षण संपादून बाहेर पडलेल्या तरुणांस आतां मराठींत पुस्तकें लिहिण्याची इच्छा होऊं लागली आहे हेंही एक फार चांगलें सुचिन्ह आहे.

आक्षेपकांचा सारा मारा काव्यें, नाटकें व कादंबऱ्या यांवर असतो. त्यांचें ह्मणणें कीं पूर्वींच्या कालीं जशीं उपयुक्त पुस्तकें झालीं तशीं उपयुक्त पुस्तकें आतां होत नाहींत. आतां लिहिणारांचा मनोरंजक पुस्तकांवर भर फार, आणि तीं अगदीं गचाळ असतात. काव्यें गचाळ, नाटकें गचाळ, कादंबऱ्या गचाळ. या विषयावर मीं बोलणें हें फार कठिण काम आहे, परंतु मला एवढें बोलल्यावांचून राहवत नाहीं कीं आक्षेपक या त्रयींतील पुस्तकांचे डोक्यांवर जितका गचाळपणा लादतात तितका गचाळपणा त्यांच्या माथीं मारण्यास कांहीं कारण नाहीं. माझी तर अशी समजूत आहे कीं, वाङ्मयाच्या या भागांतही आमची प्रगति पुष्कळ झाली आहे. आमची काव्यरचना आतां पुष्कळच उन्नतावस्थेला आली आहे. महाकाव्यें अजून होऊं लागलीं नाहींत, परंतु जीं लहान लहान काव्यें आज मितीला प्रसिद्ध होत आहेत, तीं खरोखर कवींच्या ठिकाणीं प्रतिभेचें अस्तित्व दर्शविणारीं आहेत. भगवद्भक्तिप्रेरक जें काव्य तेंच तेवढें काव्य अशीच जर काव्याची व्याख्या धरून बसलें, तर गोष्ट निराळी. व्याख्याच संकुचित–अस्थानीं व अकारण संकुचित–केली, तर पुष्कळ जुनीं काव्येंसुद्धां काव्य या संज्ञेंतून गळतील. परंतु ज्याप्रमाणें ' राज्य ' या शब्दाची आपली व्याख्या आतां फार विस्तीर्ण झाली आहे, ' राष्ट्र ' या शब्दाची व्याख्या हीं विस्तीर्ण झाली आहे, त्याचप्रमाणें काव्य या शब्दाचीही व्याख्या विस्तीर्ण झाली आहे. कवीला अगम्य किंवा त्याज्य असा कोणताच विषय नाहीं ही समजूत आतां फैलावत चालली आहे, आणि ती यथार्थच आहे. कोमेजलेल्या फुलांपासून तों तालतमालादि वृक्षांपर्यंत, पिपीलिकादि कीटांपासून तों सिंहव्याघ्रांपर्यंत, अणुरेणूंपासून तों हिमालयापर्यंत, जलधीच्या अत्यंत खोल अशा प्रदेशापासून तों सर्वव्यापी नभोमंडलापर्यंत, सारांश अंतर्बाह्य चक्षूंस दृश्य अशा सर्व विषयांवर कवीच्या कल्पनांचें प्राबल्य चालून तो त्यांस वर्णनविषय बनवूं शकतो व त्यांपासून जगास बोध करूं शकतो ही समजूत अगदीं सार्वत्रिक होत चालली आहे, त्याला स्फूर्ति मात्र झाली पाहिजे.

हीच स्थिति नाटकांची आहे. नाटकें म्हणजे देवादिकांसंबंधींच असावयाचीं असा जो एक ग्रह होऊन बसला होता, तो बदलत बदलत

राजादिकांवर आला आणि राजादिकांवरून आतां सामान्य व्यक्ति व सामान्य विषय यांवरही येऊन बसला. अद्भुत रसावरच भिस्त ठेवून तदनुषंगानें इतर रसांचा परिपोष करावयाचा अशी जी समजूत होती, ती जाऊन आतां अगदीं सामान्य जनांपैकींही नायक–नायिका घेऊन त्यांच्या चरित्रांवर नाटकें लिहिण्यांत कोणत्याही प्रकारची रसहानि होत नाहीं, सर्व रसांचा सुंदर परिपोष होतो, आणि त्यांपासून नीतिही शिकवितां येते अशी प्रतीति आली आहे. नाटकांच्या बाबतींत आणि नाट्याच्या बाबतींत पुष्कळच सुधारणा झाली आहे आणि त्या विषयाच्या चर्चेचीं पुस्तकेंही गेल्या पांच चार वर्षांत पुष्कळ निघालीं आहेत. कला या दृष्टीनें तज्ज्ञांचें व रसिकांचें नाट्यरचनेकडे अधिक लक्ष्य लागत चाललें आहे. काव्य, नाटक व कथांत कोठें कोठें अनिष्ट प्रकार आढळतात, नाहीं असें नाहीं; परंतु तेवढ्यावरून त्यांस गचाळ म्हणून झिड्कारून टाकण्याचें कारण मला दिसत नाहीं. काव्य–नाटकांविषयीं जें वर लिहिलें आहे तें कादंबऱ्या व गोष्टींसही एकंदरीनें लागू आहे.

निबंधात्मक लेख पूर्वीपेक्षां संख्येनें कितीतरी अधिक व आंतील ज्ञानानें व माहितीनेंही फार प्रशंसनीय असतात. इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ होऊन त्या शिक्षणानें संस्कृत झालेल्या मंडळींनीं जीं कामें केलीं, जे ग्रंथ लिहिले, जे शोध लाविले, ते पहातां आजची मंडळी कांहींच करीत नाहींत, आजच्या मंडळींत शोधकबुद्धि नाहीं, वगैरे विधानें कित्येक आक्षेपक अगदीं अट्टाहासानें करितात. परंतु पूर्वींच्या शोधकांस आपले शोध करण्यास व ते जगापुढें मांडण्यास जे श्रम पडले, त्याच्या दसपट श्रम आजचे शोधक करीत आहेत. पूर्वींचे ग्रंथ लिहिण्यास एखाद्या दुसऱ्या पुस्तकाचें साहाय्य पुरें होतें. आयरिश् रीडरांसारख्या क्रमिक पुस्तकांतून किंवा तशाच दुसऱ्या पुस्तकांतून असलेले शास्त्रीय धडे भाषांतर करून दिल्याबरोबर लोक चकित होत, कां कीं त्यावेळीं सर्वच नवें. परंतु आज एक वातावरणासंबंधीं पुस्तक ल्याहावयाचें, किंवा विद्युत्संबंधीं पुस्तक लिहावयाचें तर पन्नास पुस्तकांतून माहिती काढून ती संकलित करून द्यावी लागते. तशी ती दिली असली तर बरें, नाहीं तर एखादा तज्ज्ञ परीक्षक त्या लेखकाचे तावडतोब वाभाडे काढतो !

जॉन् स्टुअर्ट मिल् यानें आपल्या काळच्या ग्रंथकारासंबंधानें आपल्या डायरींत एकदां सहज कांहीं उद्गार काढले आहेत ते यासंबंधांत खरोखर ध्यानांत घेण्याजोगे आहेत. ते आपल्यापुढें मांडतों म्हणजे मागल्या पिढीच्या ग्रंथकारांपेक्षां आजच्या ग्रंथकारांना किती कठिण दिवस आले आहेत हें समजून येईल. सध्यांच्या काळीं एखाद्या विषयाबद्दल ठाम मत बनविणें हें फारच कठिण आहे. हीच स्थिति मिल्ला आपल्या समकालीन ग्रंथकारांचे ठिकाणीं दिसली.

The inferiority of the present age is perhaps the consequence of its superiority. Scarcely any one, in the more educated classes, seems to have any opinions or to place any real faith in those which he professes to have. At the same time if we compare the writings of any former period with those of the present, the superiority of these is unspeakable. We are astonished at the superficiality of the older writers; the little depths to which they sounded any questions; the small portions of the considerations requiring to be worked at which those writers appear to have seen. It requires in these times much more intellect to marshal so much greater a stock of ideas and observations.

हा उतारा मीं आपल्यापुढें एवढ्याचकरितां वाचून दाखविला कीं "सर्व काळीं मागल्यापेक्षां पुढच्यांत—समकालीनांत—कांहीं अर्थ नाहीं," असें म्हणण्याचा प्रघात असतो. परंतु तसा प्रघात पडण्यास अंशतः कारणें असतात तीं अशा प्रकारचीं असतात. परंतु पुढचे लोक दिवसानुदिवस अधिक शहाणे होतात हें मिल्चें विधान त्याच्या स्थितीसंबंधानें किती खरे आहे हें ध्यानांत घेण्याजोगें आहे. जॉन् स्टुअर्ट मिल व त्याचे वडील जेम्स मिल् या दोघांनीं इंग्रजी विचाराचीं सूत्रें जवळजवळ एक शतकपर्यंत चालविलीं. परंतु आज मितीस जॉन् स्टुअर्टच्या तर्कशास्त्रांचे व अर्थशास्त्रांचे किती तरी धुडके उडत आहेत. मेकॉलेच्या एका निबंधांत बापा-

च्या खांद्यावर बसून दूर पहाणाऱ्या मुलाचें उदाहरण दिलें आहे. बापाच्या खांद्यावर बसून दूर पहाणाऱ्या मुलानें आपणास दूर दिसतें म्हणून बढाई मारूं नये व आपल्याच उंचीमुळें आपणास तें दिसतें असें समजूं नये, परंतु दूर दिसत असलें तर तें सांगूंही नये असें कोण म्हणेल? प्रत्येक पिढी मागल्या पिढीच्या खांद्यावर बसूनच दूरचें पहात असते. मागलें ज्ञान घेऊन त्यावरून पुढचे शोध करावयाचे हें अगदीं उघड आहे. आणि त्याबद्दल आपण मागल्यांविषयीं अत्यंत कृतज्ञताही दाखविली पाहिजे. मात्र त्या कृतज्ञतेच्या भरांत पुढच्यांस अगदींच तुच्छ म्हणून धुत्कारून देऊं नये. सध्यांच्या काळीं जीवनार्थ धडपड करण्यांत प्रत्येकाचा किती काळ जातो; जीवयात्रेला लागणारी सामग्री मिळविण्याला किती अट्टाहास करावा लागतो, हें सर्व ध्यानांत आणलें म्हणजे महाराष्ट्रवाङ्मयाच्या साम्राज्याचा विस्तार वाढविण्याकरितां धडपड करणाऱ्यांची खरोखर स्तुति केली पाहिजे. स्तुति न केली तरी त्यांच्यांत कांहीं अर्थ नाहीं असें म्हणून त्यांस हताश करणें तरी अगदीं गैर असें मला वाटतें.

आक्षेपकांचा मोठा आक्षेप हा कीं, सध्यां चांगलीं पुस्तकें फारच थोडीं किंबहुना मुळींच निघत नाहींत. एकतर हा आक्षेप पुष्कळसा निराधार आहे. परंतु त्यास अणुरेणुमात्र आधार असला, तरी त्याला इतकें महत्व देण्याजोगा तो नाहीं. चांगलें-अत्यंत चांगलें-हें केव्हांही थोडेंच असावयाचें. जर्मन कवि गअठे याचें एक फार सुंदर वाक्य आहे, तें आक्षेपकांनीं सदा लक्षांत धरावें. In this world there are so few voices and so many echoes; या जगांत ध्वनि फार थोडे, प्रतिध्वनिच फार! प्राचीनकाळचें धर्मसंबंधीं वाङ्मय सोडून द्या. त्याबद्दल कांहीं बोलावयाचें नाहीं. परंतु इतर वाङ्मयांत " ध्वनि " किती आणि प्रतिध्वनि किती याचा विचार करा. कालिदास, भवभूति, जगन्नाथ पंडित, इत्यादि ध्वनि किती मोजतां येतील? आणि त्यांचे प्रतिध्वनि किती झाले आहेत? त्याचप्रमाणें आतां ऐकूं सुद्धां येत नाहींत असे किती नष्ट झाले असावे याचाही विचार करा. हीच स्थिति इतर सर्व विषयांच्या वाङ्मयासंबंधानें आहे. महाराष्ट्रवाङ्मयांत तरी काय? ज्ञानेश्वरमहाराजांपासून तों

वाक्यवृत्तिटीकाकार हंसराजापर्यंत ध्वनि किती व प्रतिध्वनि किती? सर्वांनीं वेदांत व भक्ति याच विषयावर ग्रंथ लिहिले किंवा देव व साधु यांचीं चरित्रें गाइलीं. भक्तिरसाची प्रेरक तेवढीच काय ती खरी कविता असें प्रतिपादन करणारांचें ह्मणणें गृहीत धरलें तरी ध्वनींची संख्या किती निघेल आणि प्रतिध्वनींची किती? एकंदर सहाशें वर्षांत आठ ध्वनींपेक्षां ास्त ध्वनि नाहीत! बाकी सर्व प्रतिध्वनि—त्या प्रतिध्वनींत कोणता किती वेळ टिकणारा एवढेंच तारतम्य पहावयाचें! तसेंच सध्यांच्या काळचें, किंवा पुढच्या काळचें व्हावयाचें. सध्यांच्या काळींच तेवढे प्रतिध्वनि फार असें नाहीं.

हें हंसराजाच्या नंतरच्या वाङ्मयसमृद्धीसंबंधानें म्हणजे इंग्रजी शिक्षणाच्या योगानें ज्याला नवीन स्वरूप आलें अशा ग्रंथसंग्रहासंबंधानें झालें. हंसराज हे मागल्या कवींमधील शेवटले असें मी समजतों. त्यांची सर्व प्रवृत्ति वेदांताकडेच होती. त्यानंतर जे कवि झाले त्यांनीं संस्कृत काव्य-नाटकादिकांच्या भाषांतरापासून सुरवात केली. अन्योक्ति व सुभाषितांचीं भाषांतरें केलीं. नंतर इंग्रजी कवींचे चुटके भाषांतर होऊं लागले. अद्यापि महाकाव्यें किंवा खंडकाव्यें करण्याकडे कवींची प्रवृत्ति झालेली दिसत नाहीं. तरी पण कवींच्या स्वानुभूतीचें प्रतिबिंब ज्यांत उतरलें आहे अशीं लघुकाव्यें पुष्कळ आणि सरस अशीं होऊं लागलीं आहेत. हें काव्याविषयीं झालें.

गद्यलेखनाचा प्रारंभ इंग्रजी पुस्तकांच्या भाषांतर-रूपांतरांपासून झाला व आज मितीला तें कार्य चालू असून त्यांत विविध विषयांवर रचलेल्या अशा स्वतंत्र पुस्तकांचीही पुष्कळ भर पडत चालली आहे. गद्यवाङ्मयाचा जन्म इंग्रजी भाषेच्या प्रवेशानंतरच झाला असें ह्मणण्यास मुळींच हरकत नाहीं. त्यापूर्वीं गद्यांत लिहिलेल्या बखरी, कैफियती वगैरे काय राहिल्या आहेत तेवढ्याच व मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें म्हणून जो पूर्वींचा पत्रव्यवहार अलीकडे प्रसिद्ध होतो आहे तो. या पत्रव्यवहारांतही कांहीं पत्रें वाङ्मयांत येण्याजोगीं आहेत. परंतु तीं वाङ्मय म्हणून लिहिणारानें लिहिलीं नाहींत, आणि वाचणाराही वाचीत नाहींत. तेव्हां त्यांचा त्या दृष्टीनें येथें विचार करण्याची आवश्यकता नाहीं.

आमच्या अर्वाचीन वाङ्मयावर कित्येकांचा मोठा आक्षेप–फार मोठा आक्षेप–हा आहे कीं, तें आंग्लभाषेच्या छायेनें ग्रस्त आहे. इंग्रजी विचार व इंग्रजी प्रचार, यांची त्यांत रेलचेल असते. हा आक्षेप अल्पांशानें खरा आहे. परंतु त्याला कित्येकांनीं जें नसतें महत्व दिलें आहे तें मात्र मी देऊं इच्छित नाहीं. कारण एकतर इंग्रजांचा, त्यांच्या सुधारणेचा व आपला इतका अभेद्य संबंध जडला आहे कीं, त्यांच्या आचारविचारांचा, शब्दांचा आणि भाषाप्रचारांचा प्रवेश आमच्या घरांत झाल्याखेरीज राहणें शक्यच नव्हतें आणि आज आपण आपल्या स्वतःच्या किंवा आपल्या पुढच्या पिढीच्या पोषाखाकडे, आचरणाकडे, भाषणाकडे किंवा व्यापारव्यवहाराकडे पाहिलें तर हा प्रवेश किती झाला आहे हें आपणास सहज दिसून येईल. सध्यां आपल्याला इतर बाबींचा विचार कर्तव्य नाहीं, वाङ्मयापुरतें पहावयाचें आहे. त्या दृष्टीनें पहातां आमच्या भाषेवर इंग्रजी भाषेनें फार परिणाम केला आहे इतकेंच नव्हे, पण तो एकंदरीनें पहातां फार इष्ट असाच परिणाम आहे असें ह्मणण्यास मला अणुमात्र दिक्कत वाटत नाहीं.

दोन राष्ट्रांचा नुसता शेजारसंबंध असला, तरी सुद्धां एकमेकांच्या भाषा–कोशांत, भाषाप्रचारांत व विचारांत किती तरी भेसळ होते. मग जेथें एक जेते म्हणून व शा[illegible] म्हणून आज जवळजवळ एक शतक दुसऱ्यांवर आपला अम्मल चालवीत आहेत, ज्यांनीं आपल्या प्रवेशाबरोबर अनेक हरहुन्नरांचा व विद्याकलांचा देशांत प्रवेश करून दिला, त्यांच्या भाषेंतले शब्द, त्यांच्या भाषेंतले प्रचार, आणि त्यांचे विचार हे जर दुसऱ्या भाषेंत शिरले, तर त्यांत नवल काय ? त्यांत आणखी विशेष गोष्ट ही कीं, आमचा बहुतेक काल त्यांच्या भाषेचा अभ्यास करण्यांत जातो ! स्वभाषेच्या शास्त्रोक्त अभ्यासाग बाल्यांतलीं चार किंवा पांच वर्षे आणि बाकी सर्व आयुष्य इंग्रजीच्या अध्ययनास वाहिलेलें. अशा स्थितींत आह्मीं स्वभाषा कायम ठेविली. इतकेंच नव्हे, तर ज्यांनीं आम्हांस जिंकलें, जे आमच्यावर राज्य करतात, त्यांचें शब्दभांडार व विचारभांडार आह्मी लुटून आपल्या भाषाकोशाची व विचारभांडाराची भर करीत आहों. आपलें वाङ्मय–ज्याला राजाश्रय

नाहीं व लोकाश्रयही तितकाच असें वाङ्मय-दिवसानुदिवस श्रेष्ठ बनविण्यासाठीं आह्मी मनःपूर्वक धडपड करीत आहों हेंच एक खरोखर आश्चर्यांतलें आश्चर्य आहे! ज्या भाषांना राजाश्रय नाहीं, विश्वविद्यालयाचा आश्रय नाहीं, त्यांना उन्नत दशेला न्यावयाचें, त्यांचें ग्रंथभांडार वाढवावयाचें, ही कांहीं लहान सामान्य गोष्ट नव्हे. आणि ती गोष्ट आज तशा अडचणीच्या स्थितींत आपण युरोपीय व इंग्रजी वाङ्मयभांडारें लुटून आणून साधीत आहों. इंग्रजी शब्द येतात, इंग्रजी भाषाप्रचार येतात, इंग्रजी विचारांचें मिश्रण फार होत चाललें ही ओरड कसली? आपला कोश—आपला खजिना—वाढला पाहिजे, जेथें सांपडेल तेथून सोनें आणून भरलें पाहिजे. त्या वेळेस हें कोणाच्या घरचें सोनें, या सोन्यानें आपले घरचें मूळचें सोनें बिघडेल असा विचार कोणी करतें काय? सांपडलेला निधि कोठला व कसला असा विचार करून हातचा गमाविणारास कोणीही वेड्यांतच गणील. भाषाकोशांत भर ही पडलीच पाहिजे. एके वेळीं—मराठीच्या अर्वाचीन वाङ्मयाच्या प्रारंभीं किंवा प्रारंभानंतर थोडेच दिवसांनीं ह्मणा—मराठी लेखकांवर संस्कृत शब्दांची भर करून जुनी शुद्ध मराठी बिघडवून टाकल्याचा आरोप केला जात असे. हा आरोप करणारांत मुख्य स्थान मिशनरी व साहेब लोक यांनीं पटकाविलें होतें. शब्दाची जरूरी लागली कीं संस्कृत भाषाभांडारागारांतून शब्द घेऊन मराठींत योजिला कीं तो यांना कठिण वाटे व अर्थातच "Sanskritized Marathi" च्या नांवानें त्यांची ओरड सुरू होई. त्यांत दुर्दैवाची ( त्यांच्या दृष्टीनें दुर्दैवाची परंतु आमच्या दृष्टीनें सुदैवाचीच ) गोष्ट ही कीं, प्रथम प्रथम त्यांचा संबंध शास्त्रीमंडळींशींच आला यामुळें त्या काळीं आमची मराठी भाषा नको नको म्हणतां संस्कृत शब्दांनीं व भाषाप्रचारांनीं बरीच उठावून दिसूं लागली. जर का केवळ असंस्कृतज्ञ लोकांच्या व साहेब अधिकारी आणि मिशनरी लोकांच्याच तावडींत राहिली असती तर तिला केव्हांच निवळ बायबली स्वरूप आलें असतें. आज तें गाडें फिरलें आहे. बायबलाचें भाषांतर अगदीं बिघडलें आहे असें त्यांचें त्यांस वाटून आतां त्यांचा मराठी

बायबल हळू हळू संस्कृत शब्दाच्या योजनेनें सुधारण्याचा खटाटोप सुरू झाला आहे !

संस्कृत शब्दांच्या मिश्रणानें मराठी भाषा विघडते ही हांकाटी जाऊन पुढें तिच्यांत इंग्रजी शब्दांचा व इंग्रजी भाषाप्रचारांचा वाजवीपेक्षां फाजील प्रवेश होऊं लागला आहे अशी ओरड होऊं लागली। परंतु तीही ओरड लवकरच वंद होईल. कां कीं तसें होणें अगदीं अपरिहार्य इतकेंच नव्हे तर अत्यंत आवश्यक आहे असें दिवसानुदिवस अधिक अधिक प्रत्ययास येईल. शब्दकोशांत शब्द पाहिजे असले म्हणजे लेखकांची आणि राजभांडारांत नाणीं पाहिजे असलीं कीं राजाची स्थिति सारखीच होते. सोनें असेल त्याचें नाणें पाड, रुपें असेल त्याचें नाणें पाड, तांबें असेल त्याचें नाणें पाड. शेवटीं चामड्याचें नाणें पाड पण व्यवहार चालू दे असें राजा म्हणतो. लेखक म्हणतो, मला माझें—माझ्या भाषेचें वाङ्मय वाढवून माझ्या देशबांधवांस ज्ञान द्यावयाचें आहे, त्यांना जागृति आणावयाची आहे, त्यांची करमणूक करून त्यांचा थकवा घालवावयाचा आहे. तेव्हां हें साधेल तो मार्ग मला स्वीकारला पाहिजे. नवीन विद्या हरण करून त्या भाषेंत आणून सोडावयाची पण शब्द नाहींत. शब्द वाढविले पाहिजेत, घे दुसऱ्याचे शब्द, मार त्याच्यावर आपला ठसा आणि कर त्यांना आपलेसे. एकदां रुळले कीं झाले ते आपले. तीच स्थिति विचारांची आणि भाषाप्रचारांची. जुने शब्द टाका. जुनें भाषाप्रचार टाका, जुन्या विचारांचें नांव काढूं नका असें म्हणतें कोण ? जुने शब्द ठेवा, नवेही आणा पण शब्दकोश वाढवा. जुने भाषाप्रचार ठेवा, नवेही आणा—ते आपोआप येत आहेत, त्यांना प्रतिबंध करूं नका. अर्थभेदाला त्यांचा उपयोग फार होतो. एकाच अर्थाचे भिन्न भिन्न शब्द झाले, तर त्यांचा उपयोग अर्थभेद व्यक्त करण्याकडे करा. आमचा खजिना फारच मोठा झाला बोवा, आतां हा कोणी नाहींसा करील तर बरें होईल अशी कोणी कधीं तक्रार करील काय ? तसेंच शब्दभांडाराचें आहे. तें वाढेल तेवढें चांगलें. पुष्कळ धंदे इंग्रजी राज्याबरोबर आपल्याकडे आले—आपणां ग्रंथकारांचा ज्याच्याशीं अहर्निश संबंध तो छापखान्याचाच धंदा घ्या. छापखान्यांत पाऊल टाकलें

कीं आपल्याला शब्द कोणते ऐकूं येतात ते पहा. टाइप, गॅली, प्रूफ, करेक्शन, मार्क, फिस्किट, टंपीन, फार्म, पेचकट,–आणखी किती शब्द सांगू? तेव्हां शब्दभांडारांत नवे शब्द आल्यानें किंवा भाषाप्रचारांत चार नवे प्रचार आले, म्हणून भाषा बुडाली, भाषेचा नाश झाला, अशी ओरड करण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. भाषाशुद्धि भाषाशुद्धि म्हणजे काय? भाषा हें साध्य नव्हे, साधन आहे हे विसरून जातां कामा नये. मराठी भाषेंतले जुने शब्द, जुने भाषाप्रचार अगदीं नष्ट होतील, पार जातील आणि सगळेच इंग्रजी शब्द आणि इंग्रजी वाक्प्रचार त्याची जागा घेतील हें मनांतसुद्धां आणूं नका. जुने राहून नवे येतील. भाषाकोविदांनीं व्याकरणें व कोश करून त्यांचा अर्थभेदाकडे उपयोग करण्याकडे लेखकांची वृत्ति वळवावी. माझें तर म्हणणें असें आहे कीं, आतां मराठी भाषेच्या कोशाची सुधारलेली आवृत्ति काढणारानें त्यांत निरनिराळ्या धंद्यांमुळें, रोगांमुळें, शास्त्रांमुळें मराठी भाषा बोलणारांच्या तोंडीं आलेल्या शब्दांचा समावेश केला पाहिजे. नवीन व्याकरणकारांनीं नवीन भाषाप्रचारांची व्यवस्था आपल्या व्याकरणांतून गेली पाहिजे. त्यांनीं ती केली नाहीं आणि व्याकरण बिघडलें, भाषाशुद्धि गेली, अशी नुसती ओरड करीतच ते बसले तर त्यांची ओरड अरण्यरुदिताप्रमाणेंच होणार. ग्रंथसंग्रह वाढविण्याच्या प्रवृत्तीला जी भरती आली आहे ती भरती यांच्या आक्रोशानें कधींही थांबावयाची नाहीं. त्या भरतींत नवे भाषाप्रचार येणार व नवे शब्द येणार. ते आमच्या भाषेंत शिरून बसणार. हें अगदीं निःसंशय आहे. ज्या भाषेंतील शब्द व प्रचार आमच्या भाषेंत नकोत त्या भाषेकडे पहा. 'शुद्ध अँग्लोसॅक्सन पाहिजे', 'शुद्ध अँग्लोसॅक्सन पाहिजे' करतां करतां नॉर्मन लोकांच्या वेळेपासून तों पुढें किती काळपर्यंत फ्रेंच भाषेनें तिच्यावर आपला छाप मारला आणि लॅटिन भाषेंतील शब्द तर बहुतेक फ्रेंचच्या द्वारेंच इंग्रजींत प्रविष्ट झाले आहेत. फ्रेंच आचारांविचारांची छाप तर कित्येक शतकेंपर्यंत इंग्लंडवर होती आणि अद्यापपर्यंत आहे. त्याचप्रमाणें जर्मनीनें आपल्या विचारांचीही छाप इंग्रजीवरच काय, परंतु युरोपांतील पुष्कळच भाषांवर व राष्ट्रांवर बसविली आहे. नुकती सुमारें पन्नास वर्षांच्या सुमाराची गोष्ट.

कार्लाइल व इतर कांहीं प्रासादिक लेखकांनीं जर्मन विचारभांडार इंग्रजींत आणलें, त्यासंबंधानें टेनच्या " इंग्रजी वाङ्मयाच्या इतिहासां "-तून एक उतारा आपल्याला वाचून दाखवितों.

From 1780 to 1830 Germany has produced all the ideas of our historic age; and for half a century still, perhaps for a whole century, our great work will be to think them out again. The thoughts which have been born and have blossomed in a country, never fail to propagate themselves in the neighbouring countries and to be engrafted there for a season. That which is happening to us has happened twenty times already in the world.

तेव्हां इंग्रजी शब्द. इंग्रजी वाक्प्रचार येत चालले आहेत, त्यानें आपली भाषा व आपलें वाङ्मय दुष्ट होत चाललें आहे असें समजूं नका. पुष्ट व सुष्ट होत चाललें आहे असें समजून त्याला अधिक पुष्ट होण्यास उत्तेजन द्या. या भरण्यानें भाषेची शुद्धि नाहींशी होते ही समजूत चुकीची आहे. भाषेच्या व्याकरणकारांनीं, कोशकारांनीं व व्युत्पत्तिकारांनीं या नवीन भरण्यांतील शब्दांचा व वाक्प्रचारांचा इतिहास कायम ठेवावा हें त्यांचें काम आहे.

परकी भाषेंतले शब्द घेऊं नयेत, आपल्या भाषेंतलेच शब्द घेऊन त्यांच्यापासून नवे नवे शब्द तयार करावेत, परकी शब्द घेतल्यानें भाषाशुद्धि नाहींशी होते, वगैरे वाद आपणच इकडे घालतों आहों असें नाहीं. युरोपांतलि तीन राष्ट्रें हाच वाद घालून आपल्या भाषेंत आलेले परकी शब्द हांकून देऊन आपल्या जुन्या भाषेपासून तयार केलेले नवे शब्द आणूं पहाणारी मंडळी त्यांच्यांत निघत आहेत, परंतु त्यांस यश येत नाहीं. खुद्द इंग्रजींतही अँग्लोसॅक्सन् शब्दांचा व त्यांपासून नवे शब्द करून त्यांचा उपयोग करून परकी शब्द घालवावे असा प्रयत्न करणारे कांहीं लोक आहेत, परंतु त्या प्रयत्नास यश येत नाहीं. आपले जुने शब्द व प्रचार कायम ठेवून नवे शब्द व प्रचार आणल्यानें भाषेचा

फायदा कसा होतो हें इंग्रजीवरून पाहूं. इंग्रजी भाषेचा एक नवा छोटासा इतिहास नुकताच प्रसिद्ध झाला आहे त्यांतून घेतलेला हा उतारा आहे.

An independent nation, conscious of its strength, and not afraid of being overwhelmed by foreign influences, does well, therefore to welcome the foreign names of foreign porducts. It does not thus corrupt, but really enriches its language; and even when, as in English, it possesses a multitude of synonyms, partly native and partly foreign, for more or less, the same conceptions, this variety of terms is a great advantage; for the Genius of the language, which works more by making use of existing terms than by creating them, is enabled to give to each a different shade of meaning. Thus as Bradley points out, the subtle shades of difference of meaning, of emotional significance, between such pairs as *paternal* and *fatherly*, *fortune* and *luck*, *celestial* and *heavenly*, *royal* and *kingly* could not easily be rendered in any other language.

*The English Language*—Logan P. Smith, page 59.

सुदैवानें आम्हांला आमची संस्कृत भाषा आहे, तींतून आम्हांला वाटेल तसे शब्द तयार करून घेतां येतात, आमची मराठी-मातृभाषा आहे. तींतले शब्द आहेतच. पुढें मुसलमानी भाषा आली, परंतु तींतून घेण्याजोगें वाङ्मय किंवा दुसरें कांहींच नसल्यामुळें तिच्यापासून आम्ही आपल्या शब्दसंपत्तींत किंवा वाक्प्रचारसंपत्तींत फारच थोडी भर घातली. आतां इंग्रजी आली आहे हिच्याजवळून आम्हांस धंद्यांसंबंधानें पुष्कळच वाङ्मय व शब्द घेणें आवश्यक आहे. दोनही घेतलींच पाहिजेत. आम्हांला आमची संपत्ति वाढवावयाची आहे तर गत्यंतर नाहीं. तीं घेतलीं गेलीं पाहिजेत.

या इंग्रजी वाङ्मयानें आमच्या गद्यवाङ्मयास जन्म दिला. आमच्या जुन्या भांडारांत काय काय भरलें आहे तेंही पहाण्याची आम्हांला बुद्धि दिली. एखाद्या निधीवर जसा एखादा नाग बसतो, किंवा आपल्या कोठीच्या दाराशीं कृपण बसतो तद्वत् आमची स्थिति झाली होती, ती स्थिति गेली, इंग्रजी वाङ्मयानें आमचे डोळे उघडले. आमचा संस्कृत निधि आम्हांला दिसला व त्यांतील सुवर्णरत्नें आम्ही बाहेर काढून त्याचे दागिने घडवून गळ्यांत घालूं लागलों आहों. आमच्या मराठी कवींनीं भगवद्गीता, भारत, रामायण, भागवत यांबाहेर पाहिलें नाहीं. आतां एका बाजूस आम्ही ऋग्वेदापासून तों राजतरंगिणीपर्यंत सर्व ग्रंथसमुद्राचें पर्यटन करून त्यांतील रत्नांची. दुसरीकडे इंग्रजी किंबहुना सर्व युरोपीय भाषांच्या वाङ्मयांत अवगाहन करून त्यांतूनही जीं रत्नें सांपडतील त्यांचीं देशीकार लेणीं बनवून तीं आम्ही आपल्या असंस्कृतज्ञ व अनांग्लज्ञ बांधवांस अर्पण करूं लागलों आहों. हीं दोन्हीं प्रकारचीं लेणीं आमच्या महाराष्ट्रवाक्सुंदरीच्या अलंकारभांडारांत अवश्य पाहिजेत. त्यांतलें कोणतें त्याज्य व कोणतें संग्रहणीय हें सर्वपरीक्षक काळ ठरवील. सध्यां आपलें काम भांडार वाढविण्याचें आहे. तसें भांडार वाढविल्याखेरीज आमची उन्नति होणें शक्य नाहीं. जो काय आपण आज विचार केला पाहिजे तो हाच कीं, हें भांडार वाढविण्यासाठीं अवश्यक तितके वीर पुढें येत नाहींत ते कसे आणावे ? आज जे यासंबंधांत काम करीत आहेत त्यांची संख्या अगदीं अपुरी आहे. ज्यांनीं खरोखर पुढें आलें पाहिजे ते अद्यापि पुढें सरसावत नाहींत. ते पुढें सरसावतील असें करण्यास चार साधनें आहेत.

१ युनिव्हर्सिटींत मराठी ( अर्थात् ज्यांची ती मातृभाषा असेल त्यांना ) आवश्यक विषयांत घातली गेली पाहिजे.

२ म्याट्रिक्युलेशन परीक्षेपर्यंतचें सर्व शिक्षण मराठीच्याद्वारें झालें पाहिजे.

३ मराठीसाहित्यसभेसारख्या संस्थांनीं आमच्या मराठी कोशाची नवीनावृत्ति तयार करविली पाहिजे.

४ हिंदुस्थानांतील सर्व भाषांच्या प्रतिनिधींनीं सहकार्य म्हणून विविध शास्त्रांतील पारिभाषिक शब्दांचा कोश कायम केला पाहिजे.

आजच्यासारख्या समिती व सभा यांनीं करावयाचीं हीं कार्यें आहेत. युनिव्हर्सिटीच्या व अधिकाऱ्यांच्या दाराशीं एकसारखें ठोठावीत राहिलें तरच पहिलीं दोन साधनें लाभतील. संस्थानिक, धनिक व राजे, महाराजे यांच्या दाराशीं द्रव्यासाठीं नेटानें ठोठावूं लागलें तर तिसरें साधन हातीं येणें शक्य आहे व मराठी, गुजराथी, बंगाली, हिंदी, तामील, तेलगू वगैरे भाषांच्या साहित्यसभांनीं सहवीर्य केल्यास चवथें साधन लाभेल.

जो ठोठावील त्यालाच दार उघडलें जाईल हा महामंत्र जसा इतर सगळ्या संबंधांत खरा आहे तसा तो याहीसंबंधांत खरा आहे.

मातृभाषेचा अभिमान आपण धरिला पाहिजे. तो ज्यांनीं धरला, त्यांच्या अभिमानामुळेंच मराठी भाषेला अर्थसमर्थता आली आहे. इतकी कीं, वाटेल तें शिक्षण तिच्याद्वारें देतां येईल, वाटेल तो विचार तिच्याद्वारें उच्चारतां येईल, वाटेल तो विकार तिच्याद्वारें जागृत करतां येईल व वाटेल तसें लोकमनोरंजनही तिच्याद्वारें करतां येईल. सारांश वाङ्मयाचे सर्व हेतु सिद्ध करण्याइतकें तिच्या अंगीं सामर्थ्य आलें आहे. त्या सामर्थ्याचा उपयोग आपण करून तिला अधिक समर्थ करणें हें आपल्या हातचें आहे; एवढ्याकरितां जे या कार्यक्षेत्रांत आज काम करताहेत त्यांना आणि जे अद्यापि मर्यादारेषेवर उभे राहून त्या काम करणाऱ्यांची नुसती मौज पहात आहेत त्यांना मी पुनः एकदां त्या उपनिषद्द्रष्ट्या ऋषिवरांच्या शब्दांनीं प्रार्थना करतों:–

वाग्वैतत्सर्वं विज्ञापयति वाचमुपास्स्वेति । स यो वाचं ब्रह्मेत्युपास्ते ।
यावद्वाचोगतं तत्रास्य यथा कामचारो भवति यो वाचं ब्रह्मेत्युपास्ते ॥

" वाणीच सर्व ज्ञान करून देते. तेव्हां वाणीची उपासना करा, जो वाणीला ब्रह्म समजून तिची उपासना करतो तो वाणीच्या साम्राज्यांत स्वतंत्र होतो. वाणीला ब्रह्म समजून उपासना करतो तोच असा होतो.

हें पुस्तक

पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत रा० नटेश अप्पाजी द्रविड यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REFBK-0000740

670